मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■

नवे विचार...नवी सुरुवात

■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ११९ ■ शनिवार, ०२ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




तुमचं वृत्तपत्र आता
तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.

हॅलो प्रभात
सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव
सहज,जलद आणि स्मार्ट!

# ऑगस्ट अखेरीस पाऊस दाखवणार 'खरं' रुप?

**अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली भागांना बसणार तडाखा?**



**मुंबई : हॅलो प्रभात**

संपूर्ण देशात मान्सून सक्रिय झालेला असतानाच आता ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या काही दिवसांपासून यंदाचा मोसमी पाऊस त्याचं खरं रुप दाखवण्यास सुरुवात करेल असा इशारा केंद्रीय हवामानशास्त्र विभागानं जारी केला आहे. सध्या मध्य भारतापासून ते अगदी उत्तर भारत, पर्वतीय राज्य आणि पूर्वोत्तर राज्यांमध्येसुद्धा पावसानं जोरदार हजेरी लावली आहे. तर, दक्षिण भारतातसुद्धा चित्र वेगळं नाही. दरम्यान देशभरात ऑगस्टची सुरुवातसुद्धा पावसानंच होणार असून, इथं महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये पावसाचा लपंडाव सुरू झाल्याचं पाहायला मिळेल. श्रावणसरी अर्थात ऊन- पावसाचा खेळ खऱ्या अर्थानं महाराष्ट्राच्या बहुतांश भागांमध्ये सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. यामध्ये मुंबई शहर, उपनगर, कोकण पट्टा, मध्य आणि उत्तर महाराष्ट्राचा समावेश आहे. जिथं आकाश बहुतांशी ढगाळ असून पावसाच्या हलक्या ते मध्यम स्वरुपातील सरींची हजेरी

## हवामान विभागाने वर्तवला अंदाज

पाहायला मिळत आहेच. सोबतच या भागांमध्ये अधूनमधून डोकावणारी सूर्यकिरणंसुद्धा हजेरी लावून जात आहेत.

राज्यातील विदर्भातील जिल्ह्यांमध्ये मात्र मुसळधार पावसाचा इशारा देत हवामान विभागानं या पट्ट्यासाठी सतर्कतेचा यलो अलर्ट जारी केला आहे. विजांच्या कडकडाटासह पावसाची हजेरी असेल असा प्राथमिक अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. ज्यामध्ये अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह धडकी भरवणारा पाऊस हजेरी लावून जाऊ शकतो असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मध्य प्रदेशपासून बंगालच्या उपसागरात ईशान्येपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्या कारणानं राज्यात पावसाचं प्रमाण असमान दिसून येत आहे. दरम्यान कोकणातील अंतर्गत आणि किनारपट्टी भागांमध्ये पावसाच्या ढगांची दाटी असेल मात्र, वाऱ्याच्या वेगामुळं इथं पावसाचं प्रमाण मात्र बेताचं राहील असाही प्राथमिक अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

राज्यात पावसाने काहीशी उसंत घेतल्यामुळे पुढचे काही दिवस कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. ज्यामुळं पावसानं झालेली तापमानातील घट पुन्हा वाढताना दिसेल. राज्यात बुधवारी सर्वाधिक तापमानाची नोंद अकोला येथे करण्यात आली, तेथे तापमानाचा आकडा ३०.३ अंश सेल्सिअस इतका नोंदवण्यात आला.

## संक्षिप्त...

### जुलै महिन्याचा हप्ता ८ ऑगस्ट रोजी होणार जमा

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जुलै महिन्याचा सन्मान निधी (रु. १५००) थेट जमा केला जाणार आहे. यंदा रक्षाबंधन ९ ऑगस्ट रोजी होत असल्याने महिलांच्या खात्यावर ८ ऑगस्ट रोजी लाडकी बहिण योजनेचा हप्ता जमा होणार आहे. या बाबत महिला व बालकल्यांण मंत्री आदिती तटकरे यांनी एक्स वर पोस्ट करुन ही माहिती दिली आहे.

### कोल्हापूर खंडपीठाचे स्वप्न साकार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पश्चिम महाराष्ट्रातील लाखो नागरिकांसाठी दशकांहून अधिक काळ चाललेला संघर्ष अखेर फळाला आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच (खंडपीठ) कोल्हापुरात १८ ऑगस्टपासून कार्यान्वित होणार असल्याची बहुप्रतिक्षित घोषणा मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांनी अधिसूचनेद्वारे केली.

### 'माधुरी' च्या वापसीचा मार्ग मोकळा ?

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



जनभावनांचा आदर करत 'वनतारा' संस्था माधुरीला कोल्हापुरात परत पाठवण्यासाठी सकारात्मक आहे, मात्र जोपर्यंत संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत तिचे पुनरागमन शक्य होणार नाही, असे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले.

## पुण्यात जमिनीच्या वादातून एकावर गोळीबार

**पुणे : सोमनाथ साळुंके**

जमिनीच्या कारणावरून झालेल्या वादात तिघा आरोपींनी एकावर गोळीबार करून एकास गंभीर जखमी केल्याने लोणीकंद पोलिसांनी तिघांपैकी दोन आरोपींना अटक केली असून पोलिस फरार आरोपीचा शोध घेत आहे. ही घटना गुरुवार(दि.३१) रोजी रात्री ९.३०च्या सुमारास घडली.या घटनेत सुशील ढोरे हे गंभीर जखमी झाले असून याप्रकरणी सचिन ढोरे व भिवराज हरगुडे या दोन आरोपींना लोणीकंद पोलिसांनी अटक केली आहे.तर गणेश जाधव हा आरोपी फरार आहे. चौघे ही राहणार केसनंद गावचे रहिवासी असून आरोपी सचिन ढोरे याचा जखमी सुशील ढोरे हा चुलत भाऊ असल्याचे समजते.लोणीकंद पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी व जखमी तरुण हे पुणेमनगर महामार्गावरील एका नर्सरी जवळील असलेल्या मुख्य रस्त्यावर काही कामानिमित्त थांबले असता त्यांच्यात प्रथम जमिनीच्या कारणावरून शाब्दिक वाद झाल्यावर वादाचे रूपांतर नंतर भांडणात झाल्यावर तिन्ही आरोपींपैकी सचिन ढोरे या आरोपीने रागाच्या भरात सुशील ढोरे याच्याकडे गावठी कट्टा रोखून प्रथम हवेत गोळीबार केल्यावर दुसरी गोळी जखमींच्या दिशेने फायरिंग केली.त्यावेळी पोटाच्या उजव्या बाजूस गोळी लागल्याने यामध्ये तो गंभीर जखमी झाला असून त्यास उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे.सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. घटनेचा पुढील तपास लोणीकंद पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव कुंभार हे करत आहे.

**• दोन ते तीन वर्षांपूर्वी केसनंद गावांमध्ये एका दारू पिणाऱ्या व्यक्तीची दारू सुटण्याच्या उद्देशाने संबंधित तरुणाच्या घरच्यांनी व्यसनमुक्ती केंद्रांत तक्रार केल्यावर संबंधित केंद्राचे कर्मचारी हे रुग्णवाहिकेसह त्या तरुणास घेण्यासाठी आले असता त्याच्यासह इतर तीन मित्रांनी रुग्णवाहिकेची तोडफफोड करून त्यातील एका आरोपीने हवेत गोळीबार केला होता.त्यामुळे दोन ते तीन वर्षात पुन्हा परिसरात गोळीबाराची दुसऱ्यांदा घटना घडल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वास्तवरण पसरून परिसर झालेल्या गंभीर घटनेमुळे हादरले आहे**

## 'तोडकर संजीवनी फाउंडेशन'तर्फे होम मिनिस्टर स्पर्धा उत्साहात

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

'तोडकर संजीवनी महिला स्वास्थ्य फाउंडेशन'तर्फे संस्थापिका, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या, सुप्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ आणि व्याख्यात्या संजीवनी स्वागत तोडकर यांच्या संकल्पनेतून खास महिला सभासद मैत्रिणींसाठी 'श्रावण क्वीन' आणि 'होम मिनिस्टर' स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमामध्ये महिलांचा उस्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

'होम मिनिस्टर' स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्याला गॅस शेगडी, द्वितीय क्रमांक विजेत्याला मिक्सर ग्राइंडर, तर तृतीय क्रमांक विजेत्याला कुकर अशी उपयुक्त आणि आकर्षक बक्षिसे देण्यात आली. तसेच 'श्रावण क्वीन' स्पर्धेतील सर्व विजेत्या महिलांनाही खास बक्षिसांनी गौरवण्यात आले. याशिवाय संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या 'चौथ्या लकी ड्रॉ' मध्ये विजेत्यास साऊंड सिस्टिम देण्यात आली. हा संपूर्ण कार्यक्रम संजीवनी तोडकर आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते सुप्रसिद्ध निसर्गोपचार तज्ञ स्वागत तोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत थाटामाटात, जल्लोषात व अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. महिलांच्या आरोग्याची काळजी म्हणून प्रथम उपस्थित २०० महिलांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. महिलांसाठी आरोग्य, आत्मविश्वास आणि सृजनशीलता वाढवणारे असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा संकल्प या कार्यक्रमात दिसून आला.

## उरुण ईश्वरपूर असा सुधारित अध्यादेश लवकरच निघेल

### निशिकांत भोसले - पाटील



**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

उरुण -इस्लामपूर शहराचे ईश्वरपूर नामकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पाठविलेला आहे. ईश्वरपूर असे नामकरण करण्यात आले आहे. या ईश्वरपूर नावाच्या अगोदर उरुण शब्द समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी बेमुदत साखळी उपोषण करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सांगली जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले - पाटील यांनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा दिला. यावेळी निशिकांत भोसले - पाटील म्हणाले,उरुण ईश्वरपूर असे नामकरण करण्याच्या मागणीसाठी मी स्वतः मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मागणी केली आहे. नगरपालिकेने उरुण ईश्वरपूर असा प्रस्ताव दिला आहे. लवकरच राज्य शासनाकडून सुधारित अध्यादेश निघेल असा विश्वास निशिकांत भोसले- पाटील यांनी उपोषणस्थळी दिला.

## राजारामबापू पाटील यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी

### आ.जयंतराव पाटील यांच्या हस्ते स्व.बापूंच्या पुतळ्याचे विधिवत पूजन

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू पाटील कारखाना कार्यस्थळावर लोकेनते राजारामबापू पाटील यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या हस्ते स्व.बापूंच्या पुतळ्याचे विधिवत पूजन करून अभिवादन करण्यात आले.

राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर.पाटील, वस्त्रोद्योग महासंघाचे माजी अध्यक्ष दिलीपतात्या पाटील, राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील, शिवम प्रतिष्ठानचे इंद्रजित



देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील, कार्याध्यक्ष अँड.बाबासो मुळीक, प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन, तहसिलदार सचिन पाटील, बाजार समितीचे सभापती संदीप पाटील, उपाध्यक्ष शिवाजी आपुगडे यांनी स्व.बापूंच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. जतचे सुरेश शिंदे, राष्ट्रवादीचे जत तालुकाध्यक्ष मन्सूर खतीब, शंकरराव गायकवाड, संजय शिंदे, राजारामबापू बँकेचे उपाध्यक्ष माणिक पाटील,

राजारामबापू दूध संघाचे उपाध्यक्ष शशिकांत पाटील, सह्याद्रीचे संचालक सुरेश माने, शिवाजी माने, तासगावचे जेष्ठ नेते राजाराम पाटील, माजी सभापती दत्ताजी पाटील, वाळव्याचे राजाभाऊ पाटील,

सतिशपाटील(अंकलखोप), विट्याचे किसन जानकर, जितेंद्र डूबल (कराड), जयदीप यादव (कडेपुर), अमोल डफफळे (जत), देवराज पाटील, बाळासाहेब पवार, बाळासाहेब पाटील, बी.डी.पवार, भिमराव पाटील, महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव यांच्या सह वाळवा तालुका व सांगली जिल्ह्यातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी स्व.बापूंच्या पुतळ्यास अभिवादन केले.

कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील, कार्यकारी संचालक आर.डी.माहुली, सचिव डी.एम.पाटील, कामगार नेते तानाजी खराडे, राजेंद्र चव्हाण तसेच कारखान्याचे संचालक, व अधिकाऱ्यांनी सर्वांचे स्वागत केले.

# 'हनी ट्रॅप'च्या जाळ्यात जिल्ह्यातील दोन 'माजी' मंत्री ?

## 'ते'दोन मंत्री कोण? ; राजकारण्यांची कावळ्याची नजर

**सांगली : विशेष प्रतिनिधी**

**हनी ट्रॅप आणि ड्रग्जचा विळखा राजकारणाला लपेटत आहेत. सांगली जिल्ह्यातील दोन माजी मंत्री हनी ट्रॅपच्या सापळ्यात होते असा गंभीर आरोप करत माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी सांगली जिल्ह्यात खळबळ उडविली. कोणत्या पक्षाचे, कोणत्या काळातील माजी मंत्री याबाबत मात्र एकनाथ खडसे यांनी काहीच सांगीतलेले नाही.**

तरिदेखील खडसेंच्या वक्तव्यावर 'आग लागल्याशिवाय धूर निघत नाही' अशी चर्चा राजकीय पटलावर रंगू लागली असून ते माजी मंत्री कोण? याचा शोध राजकीय जाणकारांतून घेतला जात आहे.

एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना रेव्ह पार्टीप्रकरणी गजाआड करून सत्ताधारी महायुतीने एकनाथ खडसे यांना झटका दिला. मंत्री




गिरीश महाजन आणि एकनाथ खडसे यांच्यातील वैमनस्य यामागे असल्याचा दावा एकनाथ खडसे करत असले तरी, झालेली कारवाई आणि त्या कारवाईमागील सत्यता लवकरच दृष्टेपत्तीस येईल. राजकारण म्हणजे संपूर्ण काळोख आहे. जनतेसमोर पांढरे शुभ्र कपडे घालून येणाऱ्या तथाकथित नेतेमंडळींचा इतिहास मात्र काळोखाने दाटून गेलेला असतो, तसे यापुर्वी बॉलीवूडशी संबंधित असलेल्या आणि 'नाईट लाईफ' जीवन पध्दतीचा पुरस्कार करणाऱ्या बड्या खानदानातील युवराजासंदर्भात देखील असे अनेक गंभीर आरोप झाले. चौकशी समिती स्थापन झाली, पण काही काळ जाताच पुन्हा सर्व शांत झाले. गेल्या अनेक वर्षांपासून हे असेच सुरू आहे. अडचणीत आणायचे झाले की, चौकशीचा बाऊ दाखवून शरण आणले जाते ही राजकारणातील पध्दतच आहे.

एकनाथ खडसे यांनी सांगलीतील दोन माजी मंत्री हनी ट्रॅपमध्ये अडकल्याचा आरोप करून खळबळ माजवून दिली. कोणत्या सत्तेच्या काळातील हे मंत्री याबद्दल त्यांनी काहीच खुलासा केलेला नसला तरी , जे आहेत त्यांना मात्र संदेश पोहोचला आहे. सांगली जिल्ह्यातील या दोन नेत्यांच्या यापुढील हालचालीच स्पष्ट संकेत देतील असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

परंतु एकनाथ खडसे यांनी नेमकी हीच वेळ का शोधली?, याबाबत मात्र राजकीय जाणकारांमध्ये कुजबूज सुरू आहे. सध्या भाजपात, राष्ट्रवादीत, शिवसेनेत जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. कुणाला तरी अन्य पक्षात जाण्यापासून रोखण्यासाठीच हा डाव खेळला गेला आहे का? असा अंदाजही व्यक्त करण्यात येत आहे. खडसेंना त्यांचा जावई निरपराध वाटणारच याबाबत कुणी शंका घेण्याचे कारण नाही, पण त्यांची गाडी अन्य नेत्यांवर का घसरली? याचे उत्तर मात्र आतापर्यंत सापडलेले नाही.

खडसे यांनी आपल्या जावयाच्या अटकेसंदर्भात पोलिस तपासावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे बोलत असतानाच त्यांनी हनी ट्रॅपमध्ये सांगलीमधील दोन माजी मंत्र्यांना हनी ट्रॅपमध्ये अडकवण्यात आल्याचे सांगीतले. कथित रेव्ह पार्टी प्रकरणामुळे राज्यातील राजकारण तापलं असतानाच खडसे यांनी सांगलीमध्येही हनी ट्रॅप झाल्याचा दावा करताना सांगलीमधील दोन माजी मंत्री हनी ट्रॅप अडकले असल्याचा दावा करून सांगली जिल्ह्यातखळबळ उडवून दिली आहे.